=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=

## प्रकरण दुसरे

## दादोबा पांडुरंग यांची काव्यविषयक दृष्टी

=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=

एकोणिसाव्या शतकामध्ये ब्रिटिश राज्यकर्त्यांचा किंवा त्यांच्या वाङ्‌मयाच्या परिचयामुळे मराठीमध्ये काही वाङ्‌मयप्रकार नव्याने रूढ झाले होते. त्यामध्ये चरित्र आणि इतिहास यांचाही समावेश होतो. चरित्राबरोबर आत्मचरित्राचाही परामर्श ओघानेच येतो. आत्मचरित्राची प्रथा आपल्याकडे नव्हती. अव्वल इंग्रजी कालखंडातील एकमेव आत्मचरित्र म्हणून दादोबा पांडुरंगांच्या आत्मचरित्राचा उल्लेख करावा लागेल. दादोबांचे हे आत्मचरित्र त्यांच्या वैयक्तिक जीवनातील माहितीपेक्षा त्या काळातील शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक, राजकीय ज्या काही उलाढाली होऊन गेल्या त्यांचे दर्शन घडवते.

दादोबांना आत्मचरित्र लिहिण्याची प्रेरणा कुठून झाली असावी या संदर्भात अ.का. प्रियोळकर म्हणतात, "दादोबांना आत्मचरित्र लिहिण्याची प्रेरणा कशी झाली असेल, हे सांगणे कठीण आहे. इंग्रजी भाषेमध्ये आत्मचरित्र हा वाङ्‌मयप्रकार केव्हाच रूढ झाला होता. त्यापैकी काही ग्रंथ त्यांच्या वाचनात आले असतील. १८६६ साली

सुप्रसिद्ध गुर्जर कवी व कोशाकार नर्मदाशंकर लालशंकर यांचे आत्मचरित्र "मारी हकीकत" या नावाने प्रसिद्ध झाले होते. तेव्हा ते दादोबांच्या दृष्टीपुढे असावे."[१]

दादोबांचे आत्मचरित्र अर्धेच १८४७ पर्यंतच आहे. त्या अर्ध्या भागात कुलवृत्त व जन्म, बालपणाचे स्मरण, मराठी शिक्षणाचा प्रारंभ, इंग्रजीचा पहिलाच अभ्यास, सोसायटीची शाळा, अभ्यासक्रम व गुरु, लग्न, हरिकेशवजी, सदाशिव काशिनाथ छत्रे, सोनगीरबुवा या व्यक्तींचा परिचय, एल्फिन्स्टन इन्स्टिटयूशनमधील नोकरी, जावरा येथील नबाबाकडील नोकरी, परत मुंबई येथे आगमन, एवढा दादोबांच्या जीवनकथेचा भाग यात आला आहे. दादोबांच्या वाङ्मयीन कार्याचा विचार करण्यापूर्वी दादोबांची जीवनरेखा बघणे गरजेचे आहे.

## स्थूल जीवनपरिचय:

दादोबा पांडुरंग यांचा जन्म १८१४ साली झाला. त्यांचे वडील पांडुरंगराव फार साधुवृत्तीचे होते. लहानपणापासून भगवद् भजनकीर्तनश्रवण याजवर त्यांची मोठी आवड असे. दादोबांच्यावर लहाणपणापासूनच धार्मिक संस्कार झालेले होते हे दिसून येते. दादोबा आपल्या आत्मचरित्रामध्ये म्हणतात, "मनुष्याच्या तीन अवस्थामध्ये बालपण ही अत्यंत आनंदरूप अवस्था होय."[२] लहान मुलांच्या मनात जे जे सद्गुणाचे अथवा दुर्गुणाचे अंकुर उगवतात ते विचाराच्या सूक्ष्म दृष्टीने पहाणे किंवा त्यांना नाराज करणे हे काम चातुर्याचे आहे. म्हणून असे चातुर्य आईच्या ठिकाणी असले पाहिजे. याकरिता आया सुशिक्षित

पाहिजेत तरच प्रजा चांगली होते. हे १९व्या शतकामध्ये स्त्रीशिक्षणाविषयीचे मांडलेले विचार आजही लागू होतात. स्त्रीशिक्षणाचा देशकल्याणाशी फार निकटचा संबंध असतो. दादोबांच्या मराठी शिक्षणाचा प्रारंभ कोकणातून आलेल्या पंतोजीकडे झाला. दादोबांना लहाणपणापासूनच गरीबांविषयी फार दया होती. गरीब, भिकारी आपल्या दारात येऊन भीक मागू लागले म्हणजे मोठ्या आनंदाने घरातील जुनी वस्त्रे वगैरे द्यावीत असे ते आपल्या आत्मचरित्रात म्हणतात. यावरून दादोबांची हळवी व परोपकारी मनोवृत्ती दिसून येते. १८२१ मध्ये दादोबांची मुंज झाली.

मराठीतील मूळाक्षरे शिकविण्याचा प्रारंभ दादोबांच्या वडिलांनी केला होता. त्याप्रमाणे त्यांनी आताही दादोबांना इंग्लिश शिकवावयास प्रारंभ केला. वाट्किन (Walkin ) या नावाचे एक म्हातारे गृहस्थ दादोबांना गुरु म्हणून लाभले होते. दादोबा नऊ वर्षांचे असताना वाट्किन साहेबांच्या इंग्रजी शाळेत ताजूद्दीन नावाचा पंधरा-सोळा वर्षाचा मुलगा इंग्रजी शिकावयास येत होता. दोघांची मैत्री जमली आणि दादोबा ताजूद्दीनकडून फारशी भाषा शिकले. वाचन, लेखन आणि व्याकरण शिकविण्याकरिता बापुशास्त्री मायदेव शुक्ल यांची नेमणूक झाली होती. नाना नारायण हा दादोबांचा जिवलग मित्र होता. इंग्रजी राज्य सुरु झाल्यावर मुंबईत जे पहिले पाच विद्यार्थी शिकू लागले होते त्यापैकी दादोबा पांडुरंग तर्खडकर हे एक होते.

वयाच्या चौदाव्या वर्षी दादोबांचे लग्न झाले. त्यावरून समाजात बालविवाहाची प्रथा मोठ्या प्रमाणात होती, हे दिसून येते. सन १८३५ साली दादोबांना असिस्टंट मास्तरची २० रु. पगाराची नोकरी मिळाली.

8812
A

सन १८३३ मध्ये दादोबांना मराठी भाषेचे चांगले व्याकरण तयार करावे असे विचार त्यांच्या मनात आले. त्यांनी इंग्लिश व्याकरणाच्या पध्दतीवर ते रचले. ते म्हणतात, "त्यावेळेस मला दुसऱ्या कोणत्याच व्याकरणाचा आधार नव्हता." दादोबांना लाभलेले गुरु देखील अप्रत्यक्षपणे त्यांच्या व्याकरण लिहिण्याच्या भूमिकेपाठीमागे आहेत. दादोबा मराठी शाळेत असताना पंतोजी तयार करण्याकरता रामचंद्रशास्त्री जान्हेवेकर हे मुख्य गुरु होते. बाबाचार्य हे उपगुरु. त्यांच्या हाताखाली दादोबा शिकले होते. त्याकाळी नाम, सर्वनाम, क्रियापद, विभक्ती हे शब्द एकून माहित झाले होते. असे दादोबा सांगतात. वरच्या वर्गांना मराठी व्याकरण शिकविण्याकरता बापुशास्त्री शुक्लमायदेव यांची नेमणूक झाली होती. त्यांची व्याकरण सांगण्याची पध्दती इतकी चांगली होती की, ते व्याकरणात जे काही सांगत ते विद्यार्थ्यांच्या मनात शिरत असे. असे दादोबा अभिप्राय देतात. मराठी भाषेचे व्याकरण तयार करण्याच्या भूमिकेमागे जो हेतू होता तो म्हणजे, "मराठी भाषा नियमात नव्हती तिला व्याकरणाच्या नियमात आणावी" त्यांनी आपले व्याकरण १८३४ चे अखेरीस सुरुवात करुन १८३६ चे प्रारंभी शिला छापखान्यात छापून घेतले हेच ते मराठीतील पहिले व्याकरण होय.

जावरा येथील नबाबास इंग्लिश शिकविण्याच्या कामावर दादोबांची नेमणूक झाली होती. जावऱ्याची नोकरी सुटल्यानंतर त्यांची नेमणूक एल्फिन्स्टन इन्स्टियूशन मध्ये झाली व त्यानंतर सुरत येथे प्रथमच स्थापित केलेल्या इंग्रजी शाळेत असिस्टंट इंग्लिश टीचर म्हणून झाली. त्यानंतर १८५२ मध्ये असिस्टंट कलेक्टर म्हणून दादोबांची नेमणूक करण्यात आली व मॅजिस्ट्रेटचे अधिकारही त्यांना मिळाले. अहमदनगर व ठाणे येथे नोकरी करुन सन १८६१ साली दादोबा सेवानिवृत्त झाले व सन १८८२ मध्ये

दादोबांचा मृत्यू झाला. त्यांच्या या लौकीक जीवनाकडून त्यांच्या वाङ्मयीन कार्याकडे वळूया.

## दादोबांची वाङ्मयसंपदा:

दादोबांचे नांव ज्या ग्रंथाने अमर केले तो त्याचा पहिला ग्रंथ म्हणजे मराठी भाषेचे व्याकरण होय. १८३६ साली दादोबांच्या व्याकरणापूर्वी दोन संवादात्मक व्याकरणाची पुस्तके प्रसिद्ध झाली होती. त्यापैकी पहिले बाळशास्त्री जांभेकर यांचे "बालव्याकरण" व दुसरे गंगाधरशास्त्री फडके यांचे "महाराष्ट्र भाषेचे व्याकरण" इतकी सगळी व्याकरणे असूनही दादोबानाच मराठी भाषेच्या व्याकरणाचे आद्यप्रवर्तक मानतात. कारण जांभेकर किंवा फडके यांची प्रश्नोत्तरात्मक व्याकरणे लहान मुलांकरिता म्हणून लिहिली गेली होती. विद्यार्थ्यांना आपल्या व्याकरणाचा उपयोग व्हावा हा तर दादोबांचा हेतू होताच परंतु मराठी भाषेला "नियमात बांधणे" व अशा त-हेने मराठी भाषेचे व्याकरणशास्त्र तयार करणे ही दादोबांची महत्त्वाकांक्षा होती. इंग्रजी शाळेत गेल्यावर इंग्रजी व्याकरणाचे जे त्यांना ज्ञान झाले त्यांच्या जोरावर आपल्या सूक्ष्म अवलोकनशक्तीचा उपयोग करून त्यांनी हे व्याकरण लिहीले.

## माबाईच्या ओव्या:

दादोबांचा हा अप्रकाशित ग्रंथ त्यांच्या आत्मचरित्राप्रमाणे अर्धवटच उपलब्ध आहे. यावरून दादोबा नुसते गद्यलेखक नाहीत तर कविताही रचीत होते. याची "माबाईच्या ओव्या"वरून प्रचिती येईल. या संदर्भात प्रो. द.बा. पोतदार आपल्या एका पत्रात लिहितात "दादोबा नुसते गद्यलेखक नव्हते, ते कविताही रचित. त्या कविता सोप्या सुबोध व भावभरित असत."[३] "माबाईच्या ओव्या" याचा उत्कृष्ट नमुना म्हणून सांगता

येईल. या ओव्यांचे तीन खंडामध्ये विभाजन केलेले आहे. खंड पहिल्यामध्ये दादोबांनी रुढीप्रमाणे मंगलाचरण प्रास्ताविक ओव्या लिहिलेल्या आहेत. उदा.

ओवी ही पहिली। गाईन देवाला ।
आळविन त्याला । जीवेभावे ।
देव माझा बाप । देव माझी आई । देवाला मी
गाई प्रेमभावे ।

बापास उद्देशून लिहिलेल्या ओव्या तर खंड दोनमध्ये दादोबांनी भावबहिणीस उद्देशून, बहिणीने भावास उद्देशून, वडिल भावाने धाकट्या बहिणीस, उद्देशून ओव्या लिहिल्या आहेत. तर खंड तीनमध्ये मुलांचे बालपण व मुलींचे बालपण ओव्यामधून रेखाटलेले आहे.

यावरून दादोबांची प्रेमळ कुटुंबवात्सल्, व्यक्तीची वाङ्मयीन प्रतिमा दिसून येते.

दादोबाकृत शिशुबोध:
=================

या ग्रंथांची सुरुवात "परमेश्वरोजयति" नी केली आहे. पहिल्या प्रकरणामध्ये शिशुबोध केलेला आढळतो आणि इतक्यावर्षांनी आजदेखील तो उपयोगी पडणारा आहे तर काही न पटणारे आहेत. प्रकरण २ मध्ये दादोबांनी "लोकांशी व्यवहार कसा ठेवावा" यामध्ये तत्कालीन सामाजिक चालीरीतिवर काही समस्यावर प्रकाश टाकलेला दिसून येतो. उदा. "पैशाचा अथवा देण्याघेण्याचा व्यवहार तोंडचा कदापि करू नका पांढ-यावर काळे करून व्यवहार करीत असा." तर प्रकरण तीनमध्ये "आपला स्वत:चा व्यवहार कसा ठेवावा" यामध्ये दादोबांनी "आपला

सर्व व्यवहार चोख आणि असंदिग्ध ठेवा यात तुम्हास सुख होईल. प्रकरण चारमध्ये "घरी प्रपंच कसा चालवावा" यातून भारतीय संस्कृती, एकत्र कुटुंबपध्दती दिसून येते. दादोबा म्हणतात, "या देशात अविवाहीत रहाणे आवघड आहे. म्हणून लग्नापूर्वी थोड्यातरी नियमित प्राप्तीची सोय अगोदर करावी आणि मग लग्न करावे आपल्या प्राप्तीच्या मानाने प्रपंच चालवावा. हा त्यांचा बोध आजदेखील पटण्यासारखा आहे. तर प्रकरण पाचमध्ये "सरकारदरबारात कसे वागावे" व नवव्या प्रकरणामध्ये "म्हातारपणी विसावा कसा घ्यावा" याबद्दल विवेचन केलेले आहे.

पारमहंसिक ब्राह्मधर्म:

या छोटया पुस्तकात एकंदर वीस अभंग असून कर्त्याचे नाव पुस्तकावर नाही. तरी त्याचा कर्ता "पांडुरंगात्मज दादो" हा होता. असे शेवटच्या अभंगावरून कळून येते. हे पुस्तक गणपत कृष्णाजीच्या छापखान्यात छापले. प्रकाशन काळ शाके १८०२ विक्रमनामसंवत्सरे, असा दिला आहे. यातील अभंगातून दादोबांचे धार्मिक तत्वज्ञान चांगल्या प्रकारे कळून येते.

विधवाश्रुमार्जन: (संस्कृत)

बाबा पदमनजीनी १८५७ मध्ये विधवाविवाहाच्या पुरस्कारासाठी "यमुनापर्यटन" नावाची कादंबरी लिहिली. या कादंबरीला विधवा-पुर्नविवाहाचे समर्थन करणारा एक संस्कृत भाषेत निबंधही लिहिलेला आहे. यावरून दादोबांचा सुधारणा वादी दृष्टीकोन दिसून येतो.

"यशोदापांडुरंगी" - टीका (१८६५, पृष्ठ संख्या ४६०)

महाराष्ट्र सारस्वतामध्ये दादोबा पांडुरंग यांचे नाव अमर करणारा महाराष्ट्र भाषेच्या व्याकरणानंतर त्यांचा दुसरा ग्रंथ म्हणजे "यशोदा-पांडुरंगी" ही टीका होय. हा ग्रंथ लिहून दादोबांनी मराठी भाषेमध्ये चिकित्सक टीका पध्दतीचा नवा पायंडा घातला. इतकेच नव्हे, तर मराठी कवितेविषयी लोकांमध्ये या टीकेने विलक्षण गोडी व कुतूहल उत्पन्न केले असे दादोबांचे चरित्रकार प्रियोळकर म्हणतात.

दादोबांची "यशोदापांडुरंगी" ही केकावलीवरील टीका आहे. तिची प्रस्तावना ५२ पानांइतकी आहे. दीर्घ असून तिच्यामध्ये ब-याच विषयांचा ऊहापोह केला गेला आहे. शिवाय त्याकाळच्या रिवाजाप्रमाणे इंग्रजी लेखकांप्रमाणे पाच-सहा पानांची इंग्रजी प्रस्तावनाही त्यांनी जोडलेली आहे. प्रस्तुत टीकालेखनाला आपण प्रवृत्त कसे झालो या संदर्भात दादोबा सांगतात, "वामन, मोरोपंतासारख्या महापंडितांनी संस्कृत भाषेत आपले ग्रंथ रचण्याचे सोडून प्राकृत ग्रंथ रचण्यात इतके जे परिश्रम घेतले यावरून त्यांनी त्याकाळामध्ये मिळणा-या यशाकडे न लक्ष देता इतर प्राकृत लोकांस ज्ञान व्हावे. याच औपचारिक बुध्दिने ग्रंथ रचले असावेत. म्हणून हा त्यांचा परम स्तुत्य हेतु सिध्दीस नेण्याच्या मार्गात ज्या ज्या अडचणी आढळतील त्या त्या सर्व दूर करणे असे मनात आणून ही प्राकृत टीका करण्याचा उद्योग हाती घेतला."[४] दादोबांनी ही टीका आपल्या अकाली दिवंगत झालेल्या मुलीस अर्पण केली आहे. टीकेला सुरूवात मुलीच्या "कावेरी" ही ह्या ग्रंथाची समाप्ति पाह-ण्यास परमेश्वराच्या इच्छेने राहिली नाही.

दादोबांनी आपल्या या टीकेला जे नामाभिधान दिले आहे. त्यावरून कुटुंबवत्सल दादोबा मातृपितृभक्त होते याची प्रचीती येते. "यशोदापांडुरंगी" या टीकेमधून दादोबांचे काव्यविचारही प्रकट झालेले आहेत. या टीकेच्या मराठी प्रस्तावनेतून दादोबांचे जे काव्यविचार प्रकट झालेले आहेत त्याचा परामर्श पुढीलप्रमाणे:

"यशोदापांडुरंगी" मधून व्यक्त झालेला काव्यविचार:

या प्रस्तावनेमध्ये दादोबांनी सुरूवातीला मोरोपंतांविषयी उपलब्ध असणारी चरित्रविषयक माहिती दिली आहे. मोरोपंतांची तुलना ते नैषध-काव्यकर्ता श्रीहर्ष या कवीबरोबर करतात. कारण या कवीप्रमाणेच पंताचे काव्य दुर्बोध व कठीण आहे. हरिदासांनी आपल्या कथांतून मोरोपंताची कीर्ती त्यांच्या हयातीतच काशीपर्यंत लोकपरिचित केली. व त्यानंतर दादोबांनी रसिक रामजोशीचा उल्लेख पुढे केला आहे. वामनाची व मोरोपंतांची तुलना करून त्याआधारे दादोबा म्हणतात, "यमकाच्या बाबतीत मोरोपंतानी वामनाकडून कित्ता घेतला असावा असा तर्क करून पंताची वाणी वामनापेक्षा अधिक शुध्द आणि रसभरित असल्याचे आपले मत दिले आहे. पंताचा विषय इतिहास-कथन आणि स्तवन असा असल्याने त्यांना आपल्या कवनात रस, अलंकार प्रास, आणि यमके देण्यास भरपूर केळ होता. परंतु हेही चार प्रकार रम्य आणि उत्कृष्ट रीतीने साधून पुन: शुध्द शब्दांच्या निवेशाकडे जे त्याही अपूर्व लक्ष दिले, तेणेकरून त्यांही रसिक आणि भाषाभिज्ञ अशा विद्वज्जनांच्या स्तुति-ग्रहणाविषयी पर्वकालच साधिला." त्यांच्या काव्यांत संस्कृत शब्दांचा भरणा इतका प्रकट असून त्यांनी तितक्या शब्दांचे वर्ण आणि ह्स्वदीर्घत्वही अबाधित राखले, यावरून तर त्यांच्या कवितेला पवित्रतेचा पाढाव नेसविला" असा मोरोपंताच्या काव्यचातुर्याचा नमुना म्हणून दादोबांनी त्यांच्या वनपर्वा-

तील द्रौपदी-सत्यभामासंवादातील नऊ आर्यांचे सविस्तर अर्थग्रहण आणि रसग्रहण करून दाखविले आहे. पंताच्या यमकसाधनाबद्दल त्यांना मोठे आश्चर्य व कौतुकही वाटते. याबाबतीत दादोबा म्हणतात, "सहज बोलत असता मोरोपंताच्या मुखांतून सरस आर्या निघाव्या आणि मोठेमोठे प्रास आणि यमके सहज त्यांनी साधावी इतकी परमाश्चर्यकारक कवन करण्याची हातोटी त्यास साधून गेली होती."[5] यावरून असे म्हणता येईल. कवितेतील -हस्वदीर्घत्व त्यांना महत्वाचे वाटते. मोरोपंताच्या यमक साधण्याचेही त्यांना विशेष कौतुक आहे. यमक प्रासात्मकता व अलंकार हे कवितेतील बाहयांग तसेच रसात्मकता हे अंतरंग अशा दोन्ही घटकांना दादोबांनी कवितेत महत्त्व दिलेले आहे.

मोरोपंत व वामन यांनी मराठी भाषेस संस्कृत भाषेसारखा प्रौढपणा प्राप्त करून दिला. आजपर्यंत वाङ्:मयभांडार जे संस्कृत भाषारूपी पेटीत बंद होते आणि जिची किल्ली ब्राम्हणाकडेच सुपूर्त होती ते सर्व ज्ञानभांडार ज्ञानेश्वर, एकनाथ, भावनाथ, मुक्तेश्वर, वामन, मोरोपंत यांनी प्राकृत भाषेत लोकांसमोर मांडले. मोरोपंतावर संस्कृत भाषेचा प्रभाव असल्याने त्यांचे काव्य दुर्बोध बनले आहे. संस्कृत काव्याशी स्पर्धा करणा-या आर्या मोरोपंतांनी लिहिल्या. हरिदासांनी त्या लोकांपर्यंत पोहचविल्या. मोरोपंताच्यावेळी लावण्या व कलगी तु-याची रचना करणारे रामजोशी प्रसिध्द होते. मोरोपंताच्या आर्यांमुळेच रामजोशीची वृत्ती हरिकीर्तनाकडे वळली. पेशवाईत रावबाजीच्या प्रोत्साहनाने नाच-गाण्याला प्रतिष्ठा प्राप्त झाली होती. त्यामुळे "यथा राजा-तथा प्रजा" या नयायाने सगळे वातावरण दूषित झालेले होते. अशा काळात चांगले व्युत्पन्न आणि साहित्यशास्त्रज्ञ असणा-या रामजोशीनी आपले लक्ष त्याकाळच्या पंडिताप्रमाणे वादविवादाकडे न लावता सर्वसामान्य लोकांचे मनोरंजन करण्याकडे लावले. ही बाब महत्त्वाची

आहे. शाहिरी काव्याची प्रयोजने मनोरंजन व उदरनिर्वाहासाठी (अर्थ) पैसा मिळविणे ही होती, तर पंताच्या काव्यात भक्ति, बोध, नीती व्यक्त कशी होते यावरती दादोबांनी आपली मर्मभेदक दृष्टी टाक्लेली आहे.

राम जोशी हे एक रसिक व व्युत्पन्न शाहिर परंतु मोरोपंताच्या आर्यानीच रामजोशींची वृत्ति हरिकिर्तनाकडे वळविली त्याच्यापूर्वी ते डफ तुणतुणे घेऊन लावण्यांच्या छंदावर कवने करून चरितार्थ चालवीत होते. प्रसंगी त्यांना अवहेलना सोसावी लागली. पण ते धैर्याने परिस्थितीला सामोरे गेले. म्हणून ते प्रशंसेस पात्र होत. धर्मग्रंथ व स्मृती यांच्यापुढे रामजोशींचे मन संकुचित झाले नव्हते. सवळ्या-ओवळ्यांचा व दांभिकपणाचा त्यांनी तिरस्कार करून या दांभिकांनी सत्याकडे वळावे असा प्रयत्न त्यांनी केला. रामजोशीच्या काळात लावणीसारख्या छंदावर रचना करण्याचा प्रकार लोकप्रिय ठरला होता. प्रापंचिकांना आकर्षित करण्यासाठी रामजोशींनी शृंगार, प्रौढ, कोमल अशा रसांचा अवलंब केला आहे. संस्कृत भाषेतील प्रौढ व लौकिक मराठी भाषेतील ग्राम्य शब्दांचा त्यांनी अत्यंत चातुर्याने वापर केला आहे. त्यामुळे त्या कवनांत एक निराळाच रंग भरला आहे. हे आपणास दिसून येते.

कोण्या ग सुभगाची मदनमंजरी सांग सखे सुंदरी ॥ धृ ॥
इच्या सौंदर्याची सीमा झाली गडे रतिहुनि अत्युत्तमा
पाहुनिया मुखचंद्रमा सुख गडे अमागमतिपौर्णिमा ॥

त्यांच्या शृंगार रसात कोठे कोठे बीभत्सना दिसून येते. परंतु लोक-रुची लक्षात घेता ते दोषास्पद ठरत नाही. त्यांचे आचरण जरी विलासी होते, तरी मन विषयासक्त नव्हते. व पुढे रामजोशी हरिकिर्तनाकडे वळले

यावरून असे म्हणावेसे वाटते की, "लावणी भुलली अभंगाला" मोरोपंताची वाणी प्रौढ, कारुण्य आणि वीर इ. रसांनी युक्त आहे. यमकाचे कौशल्य तर महाराष्ट्रातील इतर कविपेक्षा निर्विवाद आहे. वामन पंडितापेक्षाही मोरोपंताची वाणी अधिक शुध्द आणि रसभरित आहे. मोरोपंताच्या काव्याचा विषय प्राधान्याने इतिहासकथन आणि उपासना असल्यामुळे त्यांच्या काव्यात रस, अलंकार, त्रास आणि यमक यांना प्राधान्य मिळाले. त्यांनी शब्दांच्या वापराकडे अत्यंत बारकाईने लक्ष दिले आहे. सरस व प्रौढशब्दांचा वापर, आणि यमके साधण्यांत त्यांचे अपूर्व कौशल्य दिसते. हे संस्कृत साहित्यशास्त्राच्या पारंपरिकतेप्रमाणे तो फारसा दोषास्पद नाही. काही ठिकाणी भक्ति प्रेम व्यक्त करताना शृंगाराचा अतिरिक्त वापर केला आहे.

"केकावली" हे एक स्तोत्र आहे. त्यातून त्यांची ईश्वरभक्ती दिसून येते. ती एका विशिष्ट देवतेची नाही तर सर्व देवतांविषयी भक्ति होती हे जाणवते. दादोबांनी मोरोपंताची तुलना श्रीहर्ष कवीशी केलेली आहे. पांगारकर व विष्णुशास्त्री चिपळुणकरांनी "ज्ञानप्रसारक" व "इंदुप्रकाश" यामध्ये टीकालेखनाचा उल्लेख केला आहे. टीकाकार म्हणतात, "ग्रंथाची सुधारणा व्हावी म्हणून जो दोष आढळले ते खाली श्लोकक्रमाने लिहितो. ग्रंथाची निंदा करावी म्हणून लिहित नाही. आमची खात्री आहे की जे दोष किंवा चुका झाल्या त्या ग्रंथकर्त्याच्या बहुकार्यव्यग्रतेमुळे झाल्या आहेत. बुध्दीपूर्वक झाल्या."[६] टीकाकार म्हणून दादोबांना पहिला मान मिळतो. या संदर्भात सुषमा नर्गीकर म्हणतात, " ऐतिहासिक दृष्टया दादोबा पांडुरंग यांचे भागवतावरील परीक्षण हे सर्वप्रथम परीक्षण ठरते. म्हणून पुस्तकपरीक्षण करणारे गुंजीकर हे पहिलेच टीकाकार नव्हेत."[७]

समारोप:
======

दादोबांचा पिंड जसा गद्यलेखकाचा आहे. तसाच तो पद्यकाराचाही आहे.

"यशोदापांडुरंगी" मध्ये दादोबांनी मोरोपंत व रामजोशी या दोघांच्या परंपरा वर्णन केलेल्या आहेत. त्यानिमित्ताने दादोबांचे काव्यविषयक विचार प्रकट झाले आहेत. "मोरोपंताची वाणी मोठी प्रौढ आणि कारुण्यवीरादि रसांनी युक्त अशी असल्याचे ते दाखवून देतात. तसेच मोरोपंताच्या कवितेतील -हस्वदीर्घत्व त्यांना महत्त्वाचे वाटते. रसान्वित यमके साधण्याची हातोटी या कवीप्रमाणे इतर कोणत्याही महाराष्ट्र कवीमध्ये दिसून येत नाही. असा त्यांचा गौरवही करतात. यमक, प्रास व अलंकार हे कवितेचे बाह्यांग आहे, तर रसात्मकता हे अंतरंग अशा दोन्ही घटकांना दादोबांनी आपल्या काव्यविचारात महत्त्व दिलेले आढळते.

.......

## संदर्भ


| | | |
|---|---|---|
| १) | जोग, रा.श्री, (संपा.) | मराठी वाङ्मयाचा इतिहास: खंड चौथा, प्रकाशक-डॉ. भीमराव कुलकर्णी, कार्यवाह, महाराष्ट्र साहित्य परिषद, दुसरी आवृत्ती, १९७३. |
| २) | प्रियोळकर, अ.का, (संपादक व चरित्रकार) | रावबहाद्दूर दादोबा पांडुरंग, पूर्वार्ध-आत्मचरित्र, उत्तरार्ध-चरित्र. प्रकाशक. के.भि. ढवळे, श्री. समर्थ सदन, गिरगांव, मुंबई. प्रथमावृत्ती १९४७. |
| ३) | तत्रैव, | |
| ४) | जोग, रा.श्री,(संपा.) | मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड चौथा. |
| ५) | प्रियोळकर, अ.का. | उनि. |
| ६) | प्रियाळकर, अ.का, | उनि. |
| ७) | नार्सीकर, सुषमा चं, | समीक्षक गुंजीकर पृ. २८. |
| ८) | प्रियोळकर, अ.का, | उनि. |


.........